सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या साहित्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोन : एक चिकित्सक अभ्यास

(विशेष संदर्भ - काव्य, कथा व कादंबरी)

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाचा गोषवारा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

** संशोधक **

अनिता शिवराज पाटील

उदगीर जि. लातूर

** मार्गदर्शक **

डॉ. विजय गणपतराव वारकड

मराठी विभाग

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय,

मुखेड जि.नांदेड.

´ö - 2019

प्रस्तावना :

व्यक्ती कुटुंब आणि समाज यातून कलांचा जन्म झाल्याचे दिसून येते. त्यातील एक कला म्हणजे साहित्य होय. साहित्यकला ही मानवनिर्मित आहे. ती अगंतुक व निरावलंबी नाही. साहित्याचा जन्म भाषेतून होतो. भाषा हे साधन आहे. मानवाने विचार आणि भावनांचे दळणवळण होण्यासाठी निर्माण- केलेली ती एक सामाजिक संस्था आहे. साहित्य- संस्कृती- समाज -व्यक्ती -कुटुंब- जात - पात- धर्म अशा घटकांच्या माध्यमातून माणूस साकारतो. म्हणून व्यक्ती आणि समाज ह्या संकल्पना परस्परावलंबी आहेत. साहित्य हे समाजावेगळे नसून ते समाजसापेक्ष आहे. मानव हा समाजप्रिय असून तो समाजातच राहतो. समाजातच वाढतो व समाजातच बहरतो. व्यक्ती- व्यक्तीचे प्रश्न हे निरनिराळे असतात. त्याचे नाते समाजाशी कुठे ना कुठेतरी जोडलेले असते म्हणून व्यक्ती काय किंवा कुटुंब काय त्याचे सर्व प्रश्न समाजनिर्मित दिसून येतात. समाजामध्ये असलेली व्यक्ती, कुटुंब व त्याचा परिसर ही साहित्याची सामग्री आहे. म्हणून साहित्याचा समाजाशी आणि समाजाचा साहित्याशी निगडीत संबंध असतो.

साहित्याने मानवी मनाचे पोषण होते, जाणीवा समृध्द होतात. संवेदनशिलता,प्रगल्भ होते. मानवताविषयक दृष्टीकोन विस्तारतो. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन समंजस होतो. माणसाकडे माणून म्हणुन पाहणे, वर्ण- जातीविषयक दृष्टीकोनाचे विसर्जन करणे, समता, स्वातंत्र्य , न्यायाचा आग्रह धरणे, वर्ण, जातीलिंगव्यवस्थेने बहाल केलेले विशेष अधिकार नाकारणे, स्वकर्तृत्व, स्वप्रयत्न यावर विश्वास ठेवणे, नैतीकता, चारित्र्य व त्याग या सद्‌गुणांचा विकास साहित्य करते.

कोणत्याही सुसंस्कृत प्रगत समाजामध्ये साहित्याला महत्वाचे स्थान असते. साहित्य ही एक सांस्कृतिक व्यवस्था आहे. साहित्य व्यवहार ही समाजातील अभौतिक घटना आहे. साहित्याची निर्मिती ही केवळ व्यक्तीकेंद्रीत नसून ती समाजनिर्मित असते.

अविष्कार माध्यम भाषा हे असते, तिचा आस्वाद त्या समाजाच्या सांस्कृतिक आखत्यारित येतो. मानवाने आपल्या संस्कृतीच्या विकासाच्या टप्यात साहित्याची निर्मिती केली. मौखिक परंपरेतून, लोकसाहित्याच्य माध्यमातून आपणास साहित्याचा अविष्कार झालेला दिसून येतो. लेखनकला अवगत झाल्यापासून लिखित साहित्याला सुरुवात झाली. साहित्यामधून मानवी भाव- भावना, विचार, तत्कालीन समाजव्यवस्था अविष्कृत होवू लागली.

मानव भटक्या अवस्थेतून टोळी- टोळीने राहू लागला. पुढे कृषी संस्कृतीची निर्मीती झाली. त्यामुळे माणूस स्थीरावला. माणूस आपल्या प्रमुख गरजा भागवण्यासाठी धडपड करीत होता. त्यातून संपत्तीचा संचय करु लागला. एक माणूस दुसऱ्या माणसाचे शोषण करु लागला. त्यातून शोषीत आणि शोषक असा वर्ग उदयाला आला. हे शोषण पुढे-पुढे तो वेगवेगळ्या स्तरावर आणि विविध माध्यमांच्याद्वारे करु लागला.

मानवाने धर्म, कला, संस्कृतीची निर्मिती मानवी प्रगतीसाठी केली, पण कालांतराने त्यांच्याच माध्यमातून माणसाच्या माणूसपणाला नाकारणारी, त्यांच्या नैसर्गिक हक्काला धक्का देणारी व्यवस्था विकृतीच्या रुपाने निर्माण होवू लागली. याला विरोध करणाऱ्या विचाराधारा जन्माला येवू लागल्या. त्याचाच एक भाग म्हणून बौध्द, जैन, लोकायत इत्यादी मानवी प्रगती हा केंद्रबिंदू माणणाऱ्या विचारधारा जन्माला येवू लागल्या. पुन्हा त्यावर अनिष्ठ विचारधारा आघात करुन डोके वर काढू लागल्या. पुन्हा-पुन्हा मानवी इतिहासामध्ये सत्याचा शोध घेण्याचा आणि माणसाने 'माणूस 'पण सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न झाला. नैसर्गिक मुलभूत प्रेरणा पूर्ण करण्यासाठी योग्य, न्याय, सनदशीर व शोषणरहीत समाज, दोषविरहित समाजव्यवस्था, परंपरा निर्माण करण्याचा प्रयत्न अनेक समाजसुधारकांनी केला.

मध्ययुगीन कालखंडात अनेक प्रगतीशील सत्यशोधक विचारधारा निर्माण झाल्या. त्यात लिंगायत, महानुभाव, वारकरी, नाथ इत्यादी संप्रदायाचा जन्म झाल. समाजामध्ये जे अनेक अनिष्ठ परंपरा संस्कृतीच्या, साहित्याच्या, धर्माच्या गोंडस माध्यमातून माणसांचे माणूसपण हिरावणाऱ्या अनेक कुप्रथा स्थीर होवू पाहत होत्या. त्याचा विरोध करुन सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

आधुनिक कालखंडात सत्यशोधक समाजाचे कर्म अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते. त्यांनी सर्व अंगानी माणसा- माणसात भेदभाव करणाऱ्या शोषणावर, गुलामगिरीवर अधिष्ठित अशा समाजव्यवस्थेवर, सदोष धर्मावर, सदोष परंपरेवर सत्यशोधक साहित्याने प्रहार करण्यास सुरुवात केली. त्या सत्यशोधक समाजाची स्थापना महात्मा ज्योतिबा फुले यांनी केली. त्यांनी निःपक्षपाती विचाराला प्राधान्य दिले. नवा विचार, नवी साहित्य शोधकीय चवळवळ निर्माण केली. महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्या विचारमंचावरुन त्यांनी ज्या तत्वांची मांडणी केली त्यामधून पारंपारिक सर्व स्तरावरील सामाजिक व्यवस्था, धर्म, जाती, परंपरा, साहित्य, संस्कृती इत्यादी घटकांच्या माध्यमातून त्यांनी प्रबोधन केले. म. फुले यांच्या विचारातून प्रेरणा घेवून महाराष्ट्रात संशोधकांची एक फार मोठी फळी निर्माण झाली. त्यांनी परंपरागत चालत आलेल्या साहित्याचा नव्या दृष्टीकोणातून विचार करायला सुरुवात केली. सत्यशोधक साहित्याने मानवी गरजांना सोयीस्कर होईल आणि नव्या मूल्यांचा स्वीकार करेल अशा समाजरचनेचा पुरस्कार केला.

विषय निवडीची भूमिका :

मी महाविद्यायालयीन शिक्षण घेत असतांना माझा, परीसर, माझे जीवन माझा समाज त्यांच्या व्यथा, वेदना हया प्रामुख्याने ग्रामीण, दलित साहित्याच्या प्रवाहात आढळून येत होत्या. माझ्या सभोवतीची समाजरचना, त्याचे गुणदोष याची जाणवी मला होत होती. समाजात अस्तित्वात असलेल्या अनेक पारंपरीक गुणदोषाचे बारकाईने अवलोकन करीत होते. समाजामध्ये एकेकाळी धर्माची निर्मिती मानवी संस्कृतीच्या एका विशिष्ठ टप्यात झाली. होती. पण कालांतराने त्या साचेबध्दपणा, सांकेतिकता, कर्मकांडपणा, मानवी मूल्याची अवहेलना,

माणसा -माणसातील भेदाभेद आणि या सर्वामधून हरवत चाललेलं माणूसपण अनुभवायला येत होत. काही प्रमाणात दलित आणि ग्रामीण साहित्यातून माझ्या जाणीवा विकसीत होत गेल्या. माझी विचारप्रक्रिया सातत्याने चक्रव्यूहात अडकल्यासारखी होत होती. वेगवेगळया विचाराचे, आधाराचे, संप्रदायाचे तत्वज्ञानाचे आघात परंपरेतून माझ्या मनावर होत होते. त्यातील हितावह आणि प्रगतीकडे जाण्यासाठी खरा मार्ग कोणता ? मानव समूहाला पडलेल्या समस्यांचे मूळ कोणते ? त्यावर प्रभावी उपाय काय ? याचा शोध घेत असतांना याची उत्तरे महात्मा फुले यांनी निर्माण केलेल्या सत्यशोधकीय चळवळीत मिळू लागली. म्हणुन या साहित्याच्या वाचनामुळे सत्यशोधनाच्या परंपरेचा शोध घेण्याची जिज्ञासा माझ्यात निर्माण झाली.

व्यक्ती, कुटुंब समुह आणि समाज या सर्वाच्या आंतरक्रिया- प्रतिक्रियेतून मूल्याची निर्मिती होते. ही मूल्यनिर्मिती साहित्य संस्कृतीतून केली जाते. त्याचा शोध मी प्राचीन परंपरेत घेण्याचा प्रयत्न केला. यातून सत्यशोधनाच्या प्राचीन परंपरेची खाण माझ्या हाती लागली, जैन, बौध्द, शाक्त, लोकायत, शैव परंपरा यांनी माझ्या मनात निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. ही परंपरा मध्ययुगात वारकरी, महानुभाव, लिंगायत, सुफी, दत्त आणि पुढे आधुनिक काळात महात्मा फुले यांच्यापासून ते ग्रामीण दलित साहित्याच्या अनेक प्रवाहातून चालू होती.

सत्यशोधक साहित्याच्या अभ्यासातून, चिंतनातून सत्यशोधकी साहित्याचे सामर्थ्य अधिकच जाणवू लागले. या सर्व परंपरेतून इहवादी विचाराचे खोल संस्कार माझ्या मनावर होवू लागले. त्यात मी अधिक विस्तारात गेल्यावर माझ्या असे लक्षात आले की, एकूणच वाङ्:मयीन चर्चेत सत्यशोधकी साहित्याची अवहेलना झालेली दिसून आली. अनेक सत्यशोधक लेखकांच्या त्यागाच, मेहनतीचं चित्र माझ्या डोळयासमोर उभे टाकले. एकूणच त्याच्या लेखनीच्या मुळाशी असलेली समाजोन्नतीची तळमळ, धडपड आणि त्यांना त्यासाठी मोजावी लागलेली किंमत मर्मी घाव बसावा अशी जाणवू लागली. हळूहळू तत्संबंधी ग्रंथ वाचताना त्याचे महत्व माझ्या लक्षात आले. सत्यशोधक साहित्य चळवळीतून पूर्ण हयातभर इ.स. १९१० पासूनचे १९६५ पर्यंत अव्याहतपणे लेखन करणारे मुंकूंदराव पाटील यांच्या साहित्य योगदानाचे महत्व माझ्या लक्षात आले. कुठे तरी आपल्या अंत:करणात निर्माण झालेली विचारांची गाठ मुकुंदराव पाटील यांच्या विचारांशी पडला म्हणून मी सत्यशोधक **मुकुंदराव पाटील यांच्या साहित्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोन :एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ-काव्य,कथा व कादंबरी)** हा विषय संशोधनासाठी निवडला.

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्याशी संबंधित असणाऱ्या साहित्य वाचनाचा मी सपाटाच लावला. सत्यशोधकी विचार आणि साहित्य हा माझ्या चिंतनाचा एक विषयच झाला. त्याचे दुसरे कारण असे की, फार थोड्या अभ्यासकांनी सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या कार्याचा, चळवळीतीलत्यांच्या योगदानाचा वाङ्:मयीन अभ्यास केला, पण मला तो अभ्यास तोकडा वाटल्याने मी त्यांच्या साहित्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोणाचा शोध घेण्याचे ठरविले आहे. समाजव्यवस्था, प्रबोधन, मानवी प्रगतीसाठी त्यांची तळमळ माझ्या

मनाने आकर्षूण घेतली. म्हणून त्यांच्या साहित्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भाची ओढ आणि त्यांचे स्वरुप समजून घेण्याचा, तपशील अभ्यासणाचा प्रयत्न या प्रबंध लेखनाच्या माध्यमातून करावा असे माझ्या मनाला वाटले.

महात्मा फुले यांच्या कार्यावर अनेकांनी विचारमंथन केले, आपापल्या परीने प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आढळला, पण मुकुंदराव पाटलांच्या सामाजिक विचारांचा, त्यांच्या साहित्यातून प्रकर्षाने जाणवणारा सांस्कृतिक परिवर्तणाचा प्रयत्न मात्र अभ्यासवयाचा उपेक्षितच राहीला. म्हणून म. फुले यांच्या सच्चा वारसदाराचे योगदान नमुद करावे. या आकांक्षेने मी या विषयाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधात करणार आहे. सत्यशोधक मुकुंदराव पाटलांच्या साहित्य निर्मितीच्या प्रेरणा समाजप्रेरित वाङ्:मयातच होत्या. वाङ्मयात समाज प्रबोधनाचे सामर्थ्य असते. ते म. फुले यांच्या सच्चा वारसदाराचे योगदान नमुद करावे. या आकांक्षेने मी या विषयाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधात करणार आहे. सत्यशोधक मुकुंदराव पाटलांच्य साहित्य निर्मितीच्या प्रेरणा समाजप्रेरित वाङ्मयातच होत्या. वाङ्मयात समाज प्रबोधनाचे सामर्थ्य असते. ते म. फुले यांच्यापासून सर्व सत्यशोधकांना अचूकपणे कळले होते. मुकुंदराव पाटील यांच्या अग्रभागी होते.

प्रस्तुत प्रबंधात सत्यशोधक मुकुंदराव पाटील लिखीत काव्य, कथा व कांदबरी लेखनाचा सामाजिक आणि सांस्कृतिक अंगाने अभ्यास करावयाचा आहे. साहित्य लेखनाचे स्वरुप ? उद्देश ? त्यांच्या साहित्याची प्रबोधन क्षमता, व परिणामकारकता किती ? कोणत्या मानवी मूल्यांची प्रस्थापना करावयाची आहे ? त्यांच्या कथा, काव्य व कांदबरी लेखन यातून कोणते समाज वास्तव अविष्कृत होते ? त्यांची स्वरुपवैशिष्ट्ये कोणती ? सामाजिक प्रश्नांचा सोडवणुकीसाठी त्यांचे योगदान काय ? इत्यादीचा शोध प्रस्तुत प्रबंधात घ्यावयाचा आहे.

मुकुंदराव पाटील हे चळवळीतील क्रियाशील कार्यकर्ते असल्याने तत्कालीन संदर्भाचे गडदरंग त्यांच्या लेखनात मिसळणे हे स्वाभाविकच आहे. एका अर्थाने ते परंपरेचे प्रतिनिधी नसून काल प्रवाहाचे नेते आहेत. त्यामुळेच स्वाभाविकतेला धरुनच त्यांचे लिखान झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील समाज परिवर्तनाच्या क्षेत्रात सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे कार्य महत्वाचे आहे. ते पत्रकार, साहित्यिक, कवी, सत्यशोधक कार्यकर्ते म्हणून महाराष्ट्राला परिचित आहेत. इस १८७३ साली महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाला इ.स. १९१० नंतर जे यश आले ते सत्यशोधक मुंकुंदराव पाटील यांच्या कार्यामुळेच ! दीनमित्र चे पुनरुज्जीवन करुन म. फुले आणि जनकपिता कृष्णराव भालेकर यांचे विचार साहित्य दीनमित्रमधून सत्तावन्न वर्ष अखंडपणे पुरस्कृत केले गेले. दीनमित्र हे त्या काळातील बहुजन समाजाचे एक महत्वाचे मुख्यपत्र होते. उच्च वर्णीयांच्या स्वार्थी प्रवृत्तीवर त्यांनी कडाडून हल्लाच केल्यामुळे त्या समाजाने त्यांची उपेक्षाच केली ज्या समाजासाठी त्यांनी अहोरात्र परीश्रम घेतले, लेखनी झिजवली तो समाज निरक्षर आणि निराधार असल्यामुळे त्या समाजाला त्यांचे महत्व जेवढया लवकर लक्षात

यायला पाहिजेत होते तेवढे आले नाही. त्यामुळे त्यांच्या वाट्याला उपेक्षाच आली. मुंकुंदराव पाटील यांचे वाड्मयविचार आजही नव्या पिढीला प्रेरणादायी आहेत. म्हणून त्यांच्या काव्य कथा आणि कादंबरी लेखनातील सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनाचा अभ्यास करणे ही त्यांना काही प्रमाणात उचित न्याय देणारी बाब Š¸»Ö.

सत्यशोधक मुंकुंदराव पाटील यांनी समाज प्रबोधनासाठी साहित्य लेखन केले. ग्रामीण पत्रकारिता आणि मराठी साहित्यात ग्रामीण कवितेचा पाया भक्कम केला. समकालीन साहित्यकारपेक्षा सत्यशोधकी प्रेरणेचे त्यांनी उत्कृष्ट भान असलेले साहित्य निर्माण केले. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात मुकुंदराव पाटील यांचे वाड्मयीन कार्य बहूस्पर्शी आहे, हेही येथे नमुद करावेसे वाटते.

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांनी त्यांच्या लेखनात अग्रलेख, स्फुटलेख, चुटकुले, कथा, कविता, कादंबरी, चित्रपटकथा, वैचारिक लेख, नाटक इत्यादी अनेक वाड्मयप्रकार हाताळले. त्यांच्या लेखनाचा आवाका खूप मोठा आहे. पण अभ्यासाच्या सोयीसाठी आणि त्यातील विश्लेषणासाठी त्यांच्या प्रकाशित काव्य, कथा व कादंबरी यांची निवड केली आहे. त्यांच्या साहित्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास करावा या हेतूने मी **सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या साहित्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोन एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ-काव्य, कथा व कादंबरी)** हा विषय मी संशोधनासाठी निवडला.

प्रस्तुत संशोधन प्रबंधाचा अभ्यास करताना मी ऐतिहासिक, तौलनिक , विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पध्दतीचा अवलंब करणार आहे.

संशोधन विषयाची उद्दीष्टये :

संत्यशोधक मुंकुंदराव पाटील यांच्या साहित्याचा सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोन : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ- काव्य, कथा व कादंबरी) या विषयांच्या अनुंषगाने मी पुढील उद्दीष्टांची पुर्ती माझ्या प्रबंधात करण्याचा प्रयत्न करणार आहे.

* सत्यशोधक साहित्य परंपरेचा आढावा घेणे.
* सत्यशोधक चळवळीची तत्वे व विचारसरणीचा अभ्यास करणे.
* महात्मा फुले यांच्या काळातील क्रांतीचे स्वरुप विशद करणे.
* सत्यशोधकीय चळवळीच्या विचारांचा बहुजन समाजावरील प्रभावाचा शोध घेणे.
* मुकुंदराव पाटील यांच्या साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा व प्रवृत्ती शोधणे.
* सत्यशोधक मुकुंदरावपाटील यांच्या साहित्यातील सामाजिक दृष्टया बांधिलकीचे अनुबंध शोधणे.
* सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या साहित्यातील धर्मचिकित्सा आणि सामाजिक सुधारणेचे स्वरुप

अभ्यासणे.

* सत्यशोधक मुंकूंदराव पाटलांच्या साहित्यातील प्रबोधन अभ्यासणे.
* मुकुंदराव पाटलांच्या वैचारिकतेतून व्यक्त होणाऱ्या तत्कालीन समाज वास्तवाचा अभ्यास करणे.
* मुकुंदराव पाटलांच्या काव्यशौलीचा मागोवा घेणे
* मुकुंदराव पाटील यांच्या कथानक शैलीचा शोध घेणे
* मुकुंदराव पाटलांच्या सत्यशोधकीय कार्याचा आढावा घेणे
* मुकुंदराव पाटील यांच्या वाड्मयीन योगदानाची मांडणी करणे

प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेल्या विषयाची मांडणी मी साधारणतः पुढील प्रकरणातुन करणार आहे.

प्रकरण योजना :

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या साहित्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोन : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ- काव्य, कथा व कादंबरी) या विषयावरील शोध प्रबंधलेखनाची प्रकरणे पुढील प्रमाणे आहेत.

प्रस्तुत संशोधन विषयांच्या अनुषंगाने **सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरुप** या पहिल्या प्रकरणात प्राचीन परंपरेचा आढावा घेण्यात येणार आहे. सत्यशोधकी साहित्याची प्राचीन पंरपरा यांचा आढावा घेवून शैव, सांख्य, शाक्त, लोकायत, बौध्द, जैन आणि नाथ परंपरेचा शोध घ्यावयाचा आहे. त्यातून आधुनिक सत्यशोधकीय साहित्याच्या प्रेरणा दिसून येतात. मध्ययुगीन काळातील वारकरी, महानुभव, लिंगायत आणि कबीर यांच्या साहित्यातून अविष्कृत झालेला सत्यशोधकीय दृष्टीकोन जो आधुनिक सत्यशोधकीय साहित्याचा मुलस्त्रोत आहे. प्रस्तुत प्रकरणात आधुनिक सत्यशोधकीय साहित्याची पार्श्वभूमी अभ्यासावयाची आहे. एकंदरीत सत्यशोधकीय साहित्याची परंपरा व स्वरुपाचा शोध प्रस्तुतच्या पहिल्या प्रकरणातून घ्यावयाचा आहे.

प्रस्तुत संशोधन विषयाचे दुसरे प्रकरण **आधुनिक सत्यशोधकीय साहित्य : प्रारंभ आणि उत्कर्ष** असे असुन यात सत्यशोधकीय साहित्याचा प्रारंभ आणि त्याचे तात्वीक अधिष्ठान कसे निर्माण झाले, त्यास कारणीभूत सत्यशोधक परंपरेतील काही प्रमुख सत्यशोधकांच्या साहित्य लेखनाचा आढावा घेवून त्यातून आढळून येणाऱ्या विचारधारेचा मागोवा घ्यावयाचा आहे. त्यातील प्रमुख सत्यशोधक महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, ताराबाई शिंदे, मुक्ता साळवे, वासुदेव बिर्जे, तान्हुबाई बिर्जे, मोतीराम वानखेडे यांच्या साहित्य लेखनातील सत्यशोधक विचारधारा, त्याचे तात्वीक अधिष्ठान यांची मांडणी करावयाची आहे.

शोधप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात **सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांचे साहित्यलेख्यान व वैचारिक भूमिका** यात सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांच्या साहित्य कर्तृत्वाचा आढावा संक्षिप्तपणे घ्यावयाचा आहे.

काव्य, कथा, कांदबरी, नाटक, चित्रपटकथा, विनोदी व वैचारिक लेख, अग्रलेख इत्यादी वाडमय प्रकारात विपूल लेखन केले आहे. तत्कालीन समाज वास्तवाच्या पार्श्वभूमीवर त्यातील समाज वास्तव संक्षिप्तपणे शोधण्याचा आणि त्यातुन सत्यशोधक मुकुंदराव पाटलांची समाजविषयक विचारधारा एकूणच त्यांच्या व्यक्तीमत्वाची घडण व भूमिका येथे लक्षात घ्यावयाची आहे.

सत्यशोधक मुंकूंदराव पाटील यांच्या काव्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोन या चौथ्या प्रकरणात त्यांच्या काव्य कलाकृतीच्या आधारे अभ्यासावयाचा आहे. **कुलकर्णीलीलामृत** या खंडकाव्यात समाजातील धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय शोषणाचे भिषण वास्तव हे तत्कालीन ग्रामजीवनाच्या पार्श्वभूमीवर मांडले आहे. त्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ अभ्यासावयाचे आहेत. **¿ÖŠÌ•ÖßÖ¯ÖÝÖÖ¯Ö** या ख्यांडकाव्यात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे शोषण, सावकार आणि सरकारी काळे-गोरे अधिकारी यांच्या वागण्याच्या तऱ्हा त्याील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ, तत्कालीन ग्राम वास्तव्य यांच्या आधारे जनतेचे अहित यांचे प्रभावी चित्रण प्रबोधनाच्या माध्यमातून कसे केले शोध घ्यावयाचा आहे. **सुबोधश्लोक** या स्फुटलेखनातील धर्मसत्तेच्या माध्यमातून ग्रामीण माणसाचे दु:ख मांडण्याचा, त्यातील सामाजिकम आणि सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेवुन साहित्य लेखनाची प्रबोधन क्षमता अधोरेखित करावयाची आहे.

शोध प्रबंधाचे पाचवे प्रकरण **सत्यशोधक मुंकूंदराव पाटील यांच्या कथेतील सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोन** असे आहे. इ.स.१९३२ ते १९४४ या कालखंडात साप्ताहिक दीनमित्र, स्त्री, मनोहर, किर्लोस्कर, सारथी, विविधवृत्त आणि महाराष्ट्र शारदा या नियकालीकातून त्यांच्या कथा प्रकाशित झाल्या. अज्ञानी शेतकऱ्यांच्या जीवनाचे चित्रण करणे, हा त्यांच्या कथेचा केंद्रबिंदू आहे. धार्मिक रुढी, अंधश्रध्दा, बुवाबाजी, सावकार, भ्रष्ट अधिकारी, भट-भिक्षुक यांच्या चक्रात अडकलेल्या दरीद्री शेतकऱ्यांच्या जीवनाची ससेहोलपट प्रस्तुत प्रकरणात चिंतीत करावयाची आहे. तसेच त्यांच्या कथेतील वैज्ञानिक दृष्टीकोन, सत्यशोधकीय आशय , अर्थपुर्ण आणि समर्पक शिर्षके, त्यातील पात्र चित्रण, सामाजिक आणि सांस्कृतिक, धार्मिक संदर्भ लक्षात घेवून सामाजिक प्रबोधन प्रभावीपणे कथेच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या प्रयत्नांचा शोध या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

सत्यशोधक मुंकूंदराव पाटील यांच्या कांदबरीतील सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोन या सहाव्या प्रकरणात मुंकूंदराव पाटील यांनी इ.स. १९१० ते १९२९ या १९ वर्षाच्या काळात चार संपूर्ण आणि एक अपूर्ण असे कांबदरी लेखन केले. **ÆÖÔßÖ“Öß ¯ÖÖÔßÖ** (१९१०-१९१२) ही पहिली कांदबरी दीनमित्रमधून क्रमश : प्रकाशित झाली. या समकालीन कादंबरीचा शोध घेवून होळीची पोळी या कादंबरीतील समाजवास्तव, सामाजिक संदर्भ, समाज उपयोगी मुल्य इत्यादीचा शोध घ्यावयाचा आहे. या कादंबरी लेखनाचे सत्यशोधकीय निराळेपण, शेठजी-भटजी यांचे स्वार्थ, बहुजनाच्या अज्ञानाचा फायदा या सत्यशोधकी दृष्टीकोनाचा अभ्यास करावयाचा †ÖÆê. **चंद्रलोकीची विलक्षण रुढी अथवा दादासाहेबांची फजिती** (१९११) यातून समाज व्यवस्थेतील

पुरुषप्रधान परंपरा कशा घट्ट झाल्यात, स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक आणि त्यांचे दु:ख या कुप्रथेचे चित्रण सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भाच्या आधारे करावयाचे आहे. œÖœÖœÖ¿ÖÖÃ¡Öß ¯Ö¸Ö®Ö (1913-1915) Æß विनोदी कादंबरी दीनमित्र मधून प्रकाशित झाली. यात खलप्रवृत्तीच्या पात्रांना केंद्रस्थानी ठेवून श्रध्दामूल्य, धर्म, वर्ण, जाती -लिंग विषयक जाणीवा, सदोष जीवनविषयक दृष्टीकोन त्यातील हास्या स्पदता, उपरोध, विंडबनाच्या साहयाने कसा अधोरेखित केला याचा शोध येथे घेवून त्या लेखनाच्या परिणाम सापेक्षतेचे आणि विनोदाचे मर्म जाणून घ्यावयाचे आहे.

तोबा-तोबा (१९२४-१९२७) या कांदबरीत धर्म माणसासाठी की माणसे धर्मासाठी हा मुलभूत प्रश्न निर्माण होतो. या कादंबरीत पारंपारिक तंत्र, रहस्य, रुपांतरे, प्रेमकथा, वासनांध स्त्री-पुरुष खानदानी वैर, मानपान, प्रतिष्ठा इत्यादी लोकप्रिय बाबीचा आशय प्रतिपादनासाठी कसा वापर केला. त्यातून लोकजीवन आणि लोकसंस्कृतीचे आढळून येणारे यथातथ्य कलात्मक चित्रण याचा अभ्यास करावयाचा आहे. घटना प्रसंग, स्वभावचित्रण आणिय वातावरण निर्मितीतून व्यक्त होणारे वास्तवाचे भान, त्यातील सामाजिक आणि संस्कृतिचे संदर्भ तपासून पहावयाचे आहे. सर्वसामान्य माणसाची दु:खे, भावना, प्रवृत्ती यांचे घडणारे दर्शन याचा उहापोह येथे करावयाचा आहे. विषय निवडीतील नावीन्य, अपूर्णत्वाचे कारण, कादंबरीतील सामाजिक आणि मानसशास्त्रीय चित्रण कसे लक्षणीस आहे, त्यातून निर्माण होणारे समाज वास्तव अनेक कादंबरीच्या आशयातील सामाजिक आण्यि सांस्कृतिक संदर्भ अभ्यासावयाचे आहेत.

सत्यशोधक मुंकूदराव पाटील यांच्या साहित्यातील सामाजिक आणि सांस्कृतीक दृष्टीकोन : एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ- काव्य, कथा व कादंबरी) प्रस्तुत संशोधन विषयाचा अभ्यास करत असतांना हाती निष्कर्ष मी प्रबंधाच्या निष्कर्षात्मक विवेचन या सातव्या प्रकरणात मांडणार आहे.

संशोधन मार्गदर्शक

अनिता शिवराज पाटील
उदगीर जि. लातुर

संदर्भ ग्रंथ

1. महात्मा फुले समग्र वाड्मय , य.दि.फडके, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
2. सत्यशोधकी साहित्याचा इतिहास, सत्यशोधकी साहित्य प्रकाशन, लातूर
3. मराठी साहित्य समाज आणि संस्कृती, आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
4. साहित्याचा अन्वयार्थ, नागनाथ कोतापल्ले, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
5. युगप्रवर्तक महात्मा फुले गौरव ग्रंथ, विद्याभारती प्रकाशन, लातूर.
6. महात्मा फुले : व्यक्ती आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
7. मराठी विश्वकोश, लक्ष्मणशास्त्री जोशी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
8. मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे.
9. साहित्याचे निकष बदलावे लागतील, शरणकुमार लिंबाळे दिलीपराज प्रकाशन, पुणे.
10. साहित्य शोध आणि बोध, वा.ल.कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन मुंबई .
11. स्त्री -पुरुष तुलना, नागनाथ कोतापल्ले (संपा), कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
12. साहित्याची भाषा, भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन औरंगाबाद.
13. वाड्मयेतिहासाची संकल्पना, प्रतिभा प्रकाशन, पुणे.
14. साहित्य आणि सामाजिक संदर्भ, अंजली सोमन, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
15. महात्मा फुले व्यक्तीत्व आणि विचार, गं.बा. सरदार, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.

संशोधक

अनिता शिवराज पाटील

उदगीर जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ.विजय गणपतराव वारकड

संशोधक मार्गदर्शक, मराठी विभाग

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय मुखेड